Government of Maharashtra

# Government Polytechnic, Pune

(An Autonomous Institute of Government of Maharashtra)
University Road, Shivaji Nagar, Pune- 411016

**Dr. Vitthal S. Bandal** Phone. 020-25676818
B.E.(Electrical) (Gold Medalist)
M.E.(Electrical) Ph.D. (IIT Bombay)
**Principal**

Email- principal.gppune@dtemaharashtra.gov.in
Website- www.gppune.ac.in

---

दि.19/11/2020

## विद्यार्थ्यांकरिता महत्वाची सुधारित सूचना

संदर्भ :१)परीक्षानियंत्रक , शासकीयतंत्रनिकेतन , पुणे यांनी संस्थेच्या संकेत स्थळावरप्रसिद्ध केलेली बॅकलॉग विषयांची ऑनलाईन परीक्षा समसत्र-२०१९विषयीची सूचना दि. १७/११/२०२०.

२) संस्थेतील सर्व विभागप्रमूख ,कर्मशाळाअधीक्षक व परीक्षानियंत्रक यांची मा. प्राचार्य यांच्या अध्यक्षते खालील गुगल मीट द्वारे बैठक दि १८/११ /२०२०.

अ) नियमित पदविका अभ्यासक्रमातील समसत्र २०१९ ची विषय नोंदणी व सत्रकर्म पूर्ण झाल्यावर १८० क्रेडिट विषयांची व नॉन क्रेडिट विषयांची नोंदणी पूर्ण न झालेले विद्यार्थी . तसेच अंशकालीन पदविका अभ्यासक्रमातील समसत्र २०१९ ची विषय नोंदणी व सत्रकर्म पूर्ण झाल्यावर १८० क्रेडिट विषयांची नोंदणी पूर्ण न झालेले विद्यार्थी.

ब) ' अ ' मधील अट पूर्ण करणारे व समसत्र २०१९ पूर्वी बॅकलॉग विषय असणारे विद्यार्थी.

वरील अ व ब या दोन्ही अटी पूर्ण करणारे विद्यार्थी ऑनलाईन समसत्र २०१९ बॅकलॉग परीक्षेकरिता पात्र आहेत , अशा सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते कि संदर्भ क्र.२ मध्ये नमूद केलेल्या बैठकीतील COVID – १९ या साथरोगाच्या पार्श्वभूमीवर उद्भवलेल्या असाधारण परिस्थितीमुळे घेतलेल्या निर्णयानुसार **फक्त डिसेंबर२०२० मध्ये होणाऱ्या समसत्र-२०१९ बॅकलॉग विषयांच्या (MCQ आधारित ) ऑनलाईन परीक्षेसाठी परीक्षानोंदणी करिता फक्त १० (दहा) सैद्धांतिक विषयांची असलेली अट लागू करण्यात येणार नाही. यामुळे बॅकलॉग परीक्षेस पात्र सर्व विद्यार्थ्यांना त्यांचे समसत्र-२०१९ पूर्वी असलेले सर्व बॅकलॉग विषय देता येतील.सबब या परीक्षेस सर्व पात्र विदयार्थ्यांनी संदर्भ क्र.१ मध्ये नमूद केलेल्या दि. १७/११/२०२० सूचने ऐवजी खाली नमूद केलेल्या ३ बाबी काळजीपूर्वक वाचून त्याप्रमाणे कृती करावी.**

1) आता पर्यंत ऑनलाईन समसत्र २०१९ बॅकलॉग परीक्षे करिता पात्र आहेत परंतु ज्या विदयार्थ्यांनी परीक्षा नोंदणी केलेली नाही अशा विद्यार्थ्यांकरिता परीक्षा शुल्क रु. ६००/- (रु. सहाशे फक्त ) भरून परीक्षा नोंदणीकरीता **दि. 20/11/2020 ते दि. 22/11/2020** पर्यंत संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे . **अशा विद्यार्थ्यांनी आपला परीक्षा**

**अर्ज आपल्या MIS लॉगिन मधून विहित परीक्षा शुल्कासहित ऑनलाईन पद्धतीने दि. 22 नोव्हेंबर 2020 पर्यंत जमा करावा . दि. 22 नोव्हेंबर 2020 नंतर या बाबत आलेल्या कोठल्याही विनंतीचा विचार केला जाणार नाही याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

2) ज्या विद्यार्थ्यांनी समसत्र-२०१९ करिता परीक्षा नोंदणी केलेली आहे अशा विद्यार्थ्यांच्या MIS लॉगिन मध्ये विद्यार्थ्यांच्या बॅकलॉग विषयांच्या ऑनलाईन परीक्षेकरिता प्रवेशपत्र (हॉल-तिकीट) दि 20 नोव्हेंबर 2020 पासून उपलब्ध करून देण्यात येत आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने आपले प्रवेशपत्रात (हॉल-तिकीट) नमूद केलेले फक्त बॅकलॉग विषय तपासून पाहावे. बॅकलॉग विषयाबाबत **प्रवेशपत्रात काही त्रुटी असल्यास सदरील त्रुटी आपले नाव ,एनरोलमेंट क्रमांक , मोबाईल नंबर व त्रुटी नमूद केलेला अर्ज परीक्षा विभागास** exam.dept@gppune.ac.in **या मेल आयडीवर प्रवेशपत्रासह** (scanned copy) **दि. 22 नोव्हेंबर 2020 पर्यंत पाठवावा. दि. 22 नोव्हेंबर 2020 नंतर या बाबत आलेल्या कोठल्याही विनंतीचा विचार केला जाणार नाही याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

3) उपरोक्त क्र. १ किंवा २ नुसार कृती केल्या नंतर , संदर्भ क्र. १ मधील सूचने नुसार बॅकलॉग विषयांची ऑनलाईन परीक्षा समसत्र-२०१९ करिता पात्र विद्यार्थ्यांकडे ऑनलाईन परीक्षा देण्याविषयी असलेल्या सुविधांविषयी सर्वेक्षण करण्याकरिता सर्वेक्षण फॉर्म परीक्षेस पात्र विद्यार्थ्यांच्या MIS लॉगिन मध्ये दि-20/11/2020 पासून उपलब्ध असेल. विद्यार्थ्यांनी त्यांच्याकडील तांत्रिक सुविधांविषयी सर्वेक्षणफॉर्म मध्ये व्यवस्थित माहिती द्यावी अन्यथा ऑनलाईन परीक्षेत येणाऱ्या तांत्रिक अडचणीस विद्यार्थी जबाबदार राहील. **सदरील सर्वेक्षण फॉर्म सर्व विद्यार्थ्यांनी दि. 22/11/2020 पर्यंत भरून MIS लॉगिन मध्ये सबमिट करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.**

**वरील सूचने नुसार विद्यार्थ्यांनी कृती करावी. सूचने नुसार कृती न केल्यास होणाऱ्या परिणामास विद्यार्थी जबाबदार असेल याची नोंद घ्यावी.**

19/11/2020

परीक्षानियंत्रक

शासकीयतंत्रनिकेतन ,पुणे

प्रत :- १) मा.प्राचार्य ,शासकीय तंत्रनिकेतन ,पुणे याना माहितीस्तव सविनय सादर.

२)सर्व विभागप्रमुख याना विनंती कि सदरील सूचना आपल्या विभागातील विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

३) MIS प्रभारी याना माहितीस्तव .